MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२२९ | शनिवार दि.११ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -229 | SATURDAY DT. 11 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |



## तलवाडा मंडळ विभागातील गोदापट्ट्यात महसूल विभागांच्या अधिकाऱ्यांचे वाळू माफियांना अभय!

गेवराई । प्रतिनिधी

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता लागल्यापासून ग्रामीण भागातील अवैध धंद्यांना ऊत आलेला आहे. दिवसाढवळ्या होत असलेल्या वाळू उपशामुळे वाळू माफियांचे चांदीचे दिवस आल्याचे दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातील महसूल विभागाशी निगडित असलेला वाळू व्यवसाय दिवसेंदिवस डोके वर काढत असल्याचे चित्र सरासपणे पाहावयास मिळत असून गेवराई तालुक्यातील गोदाकाठचा वाळू पट्टा अवैधरित्या पोखरला जात असताना महसूल मंडळातील अधिकारी व कर्मचारी वाळू माफियांना अभय देत असल्याची चर्चा गेवराई तालुक्यातील तलवाडा भागात ऐकण्यास मिळत आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्री व दिवसाढवळ्या महसूल चा लाखो रुपयांचा कर बुडवत गोदापट्ट्यातून वाळू उपसा व वाहतूक सुरूच असल्याचे नागरिकांत बोलले जात आहे. तसेच वाळू वाहतूक सूरू असल्याचे चित्र कॅमेऱ्यात कैद झालेले असताना देखील याप्रकरणी मंडळाधिकारी व इतर कर्मचाऱ्यांशी संपर्क केल्यास उडवाउडवीची उत्तरे मिळतात.

# गेल्या वीस वर्षापासून खासदाराची खुर्ची मुंडे घराण्यामध्ये देणारे मराठा दलित मुस्लिम जातीवादी कसे?





### माजीआमदार संगीता ताई ठोंबरे माजी जिल्हाध्यक्ष भाजपा रमेश पोकळे यांची राजकीय आत्महत्या कोणामुळे?

### भाजपाचे शहराध्यक्ष भगीरथ बियाणे यांची आत्महत्या कोणामुळे व का?

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये दलित मुस्लिम व मराठा मतदार मताचे महत्त्व २०२४ निवडणुकीमध्ये बीड लोकसभेमध्ये पाहायला मिळत आहे यावेळी पंकजाताई मुंडे यांचे गणित हे कच्च असल्याची चर्चा बीड शहरांमध्ये चालू आहे यावेळी चांडाळ चौकडीमुळे हे गणित कमी झालेला असताना चांडाळ चौकडी आत सुद्धा पंकजाताई मुंडे यांच्या जवळ नवीन व जुन्या कार्यकर्त्यांना जाऊन देत नाहीत त्या कार्यकर्त्यांच्या विषयी पंकजाताई किंवा प्रीतम ताई यांच्या कानामध्ये वेगळ्या पद्धतीची चर्चा करून संबंधित लोकांना तोडण्याचं काम यावेळी पंकजाताई व प्रीतम ताई यांच्या जवळीच्या चौकडी करत असताना मात्र हा सर्व प्रकार पंकजाताई उत्तम ताई यांच्या लक्षात का येत नसेल असाही प्रश्न यावेळी जनतेला पडलेला आहे परंतु पंकजाताई मुंडे यांच्या राजकीय गणित आखण्यात वेगवेगळ्या जाती धर्मातील छोटे छोटे जातीचे नेते व कार्यकर्ते यांना सोबत घेणं काळाची गरज आहे. कारण मराठा आरक्षणाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आवाजानंतर मराठा समाज एक वाटलेला दिसत आहे. परंतु या छोट्या छोट्या जातीचा जर गणित पंकजाताई मुंडे यांनी धरलं तर यावेळी पंकजाताई मुंडे यांचा विजय निश्चित मला जाऊ शकतो परंतु यावेळी पंकजाताई मुंडे यांनी छोट्या छोट्या जातीचे कार्यकर्ते व नेते मंडळी यांना कोणाच्या सांगण्यावरून दाबलं हा प्रश्न यावेळी नक्कीच सर्व जनतेला पडलेला आहे परंतु याच जाती पंकजा ताईंना निवडून आणू शकतात आणि पंकजा ताईंना पाडू सुद्धा शकतात एवढी धमक या छोट्या छोट्या जातीच्या मतदानाच्या माध्यमातून एक मोठा वर्ग सुद्धा या छोट्या छोट्या जातींच्या विरोधामध्ये जाण्यासाठी मज्ञाव करत नाही परंतु पंकजाताई मुंडे आज तुम्ही या जातीचे विरोधात जाऊन तुम्ही आज ही निवडणूक जिंकण्यासाठी वाटत आहे.

**धनगर समाजाचा संघर्ष धनगर आणि बंजारा संघर्ष मध्ये भटक्या विमुक्त वर्गामध्ये जाण्याचा मार्ग मोदी साहेबांनी मोदी साहेबांनी बंद करुन टाकला?**



### पाशा पटेल यांचा राजकीय वनवास कोणामुळे व का?

**नारायण गड भगवानगड बंकट स्वामी मठ येथील भक्तांची आस्था कोणाच्या बाजूने राहणार?**

**जनतेतून निवडून आलेले आमदार सुरेश धस लक्ष्मण पवार यांना पालकमंत्री पद कोणामुळे मिळाले नाही?**

**जिल्हा परिषद अध्यक्ष ओपन साठी असताना आजी-माजी पालकमंत्र्यांनी सगळे सोयऱ्यांना प्राध्यान्य का दिले ?**

**संग्राम धनवे धनंजय गुंदेकर लोकपत्रकार भागवत तावरे हे हे पालकमंत्र्याचे सल्लागार आज पंकजाताईचे विरोधात कसे?**

### टक्केवारी घेणारे मतदानासाठी काय देणार?

**मराठा समाजाच्या अंगावर जायचं छोटे छोटे समाज मराठा समाजाची भीती दाखवून एक करायचे हे समाज एक झाल्यावर मुस्लिम समाजाच्या अंगावर जायचं मुस्लिम समाज एक झाल्यावर मराठ्यांना हिंदुत्व दाखवायचं ही भाजपची रणनीती फेल ठरणार**

**सरपंच ग्रामपंचायत सदस्य नेते युवा कार्यकर्ते यांच्याकडून कामाच्या मोबदल्यात टक्केवारी घेणारे मतदानासाठी काय देणार?**







बीड प्रतिनिधी- सध्या भारत देशामध्ये नरेंद्र मोदी यांच्या सरकारने अक्षरशः हाकार माजवला आहे असा आरोप करणारे भारतातील नागरिक व वेगवेगळ्या पक्षाचे नेते मंडळी यांनी आज आरोप प्रत्यारोपच्या एकमेकांवर सत्ताधारी व विरोधात एकमेकांना समोरासमोर विरोध करत आरोप्याच्या पहिले जाडत आहेत यातच महाराष्ट्र मध्ये होऊ घातलेल्या निवडणुका यामध्ये बीड जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवार बीड लोकसभेच्या पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात महावीर कसा गाडीचे शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बजरंग बप्पा सोनवणे हे निवडणूक लढवत आहेत याच मुद्द्यावरती याच मराठा आरक्षणाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांनी आवाहन केले आहे की मराठा समाजाला ज्यांनी त्रास दिला मराठा समाजाला आरक्षणाच्या विरोध केला त्याला शंभर टक्केच पाडा असा असे आवाहन केल्याच्या नंतर यावेळी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या एकावर कोट्यावधी या संख्येने मराठा समाजाचे पोटात असतानाच पंकजाताई मुंडे या छोट्या छोट्या जाती धर्माला सोबत घेत या निवडणुकीमध्ये आपली राजकीय पोळी भाजून घेण्याच्या प्रयत्नात आहेत परंतु यावेळी दलित मुस्लिम व मराठा हा जातीवादी कसा असू शकतो अशी चर्चा बीड जिल्ह्यातील लोकांमध्ये सध्या जोडधरू लागले आहे याच भागाचा महत्त्वाचा म्हणजे त्यांच्याच पक्षातील भगीरथ दादा बियाणे यांच्या आत्महत्या प्रकरण असेल माजी आमदार व मागासवर्गीयाचे आमदार म्हणून राहिलेल्या केज मतदार संघाच्या संगीता ताई ठोंबरे असतील किंवा भाजपाचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे असतील व मुस्लिम समाजाचे नेते जे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे विश्वसू समजले जाणारे पाशा पटेल यांच्या राजकीय आयुष्यामध्ये काय झालं हे सर्वांना माहिती आहे कोणामुळे हे सर्वजण बाजूला गेले याच चांडाळ चौकडी चांगल्या कार्यकर्त्यांना नेते मंडळींना बाजूला सारण्याची चर्चा ज्या त्या समाजातून दोन धरू लागली आहे परंतु पंकजाताई मुंडे असतील किंवा प्रीतम ताई मुंडे असतील यामध्ये सफल चौकशी करून संबंधित नेते मंडळींना विश्वासात घेणं ही काळाची गरज होती व आहे परंतु या सर्वांना बाजूला सारून पंकजाताई मुंडे असतील किंवा प्रीतम ताई मुंडे असतील यांना नेमकं काय साध्य करायचं आहे आज या बातमीमधील वरील मुद्दे हे महत्त्वाचे आहेत या मुद्द्यावर पंकजाताई असतील किंवा प्रीतम ताई असतील यांनी दहा मिनिटे स्वतः आत्मचिंतन करावे वेळ काढून दहा मिनिटात च्या आत्मचरित्र चिंतनामध्ये सर्व काही चित्र स्पष्ट समोर येईल ताईसाहेब आपण सांगण्याचा हात परंतु आपल्या आजूबाजूची जी चांडाळ चौकडी आहे ती खूपच धक्कादायक प्रकार करत आहेत यावेळी या त्या छोट्या छोट्या जाती धर्मातील लोकांना अरे दहावीची भाषा वापरत धक्कादायक प्रकार करून त्यावेळी त्यांना बाजूला सांगण्याचा काम करत आहेत हा धक्कादाय प्रकार हात मतपेटीतून वेगवेगळ्या समाजाचे नेते मंडळी कार्यकर्ते व जनता रोज दाखविल्याशिवाय राहणार नाही अशी चर्चा बीड शहरामध्ये जोर धरू लागली आहे.

# अखेर जप्त केलेली अपर जिल्हाधिकाऱ्यांची कार कोर्टाने सोडली

### सव्वा दोन लाखांचा मावेजा दिला नसल्याप्रकरणी कार जप्त करण्यात आली होती

गेवराई । प्रतिनिधी

जमीन संपादनाचा वाढीव मावेजा एक महिन्याच्या कालावधीत न्यायालयात जमा केला जाईल, अशी लेखी हमी बीडच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी न्यायालयास दिली. त्यानंतर जिल्हा न्यायाधीश-५ के. आर. जोगळेकर यांनी अपर जिल्हाधिकाऱ्यांची जप्त केलेली कार सोडून देण्याचा आदेश गुरुवारी दिला. यामुळे जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांचा जीव भांड्यात पडला.

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील रामभाऊ ऊर्फ रामराव देवराव पवळ यांची १९९५ साली जमीन गावठाण वस्तीवाढ योजनेंतर्गत संपादित करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा न्यायालयाने एलएआर क्रमांक १२१६/१९८९ या प्रकरणात २४ जुलै १९९५ रोजी आदेश पारित करून कलम १८ नुसार वाढीव मावेजा मंजूर करण्यात आला होता. परंतु मावेजा न मिळाल्यामुळे रामराव पवळ यांच्या वारसाने जिल्हा न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. २ लाख ३५ हजार ९५१ रुपयांचा भरणा करण्याचा आदेश जिल्हा न्यायाधीश-५ के. आर. जोगळेकर यांनी संबंधित विभागास दिला होता. परंतु त्याचा भरणा झाला नसल्याने ६ मे रोजी अपर जिल्हाधिकारी यांची कार क्रमांक एमएच-२३, बीसी-३१२२ जप्त करण्यात आली होती. दरम्यान, सदरील प्रकरणावर जिल्हा न्यायालयात गुरुवारी सुनावणी झाली.




### एक महिन्यात वाढीव मावेजा देण्याची हमी

सुनावणीदरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव या स्वत: उपस्थित होत्या. एक महिन्यात वाढीव मावेजाची रक्कम दिली जाईल, अशी लेखी हमी दिल्यानंतर न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या कारची चावी संबंधिताना देण्यात आली. एक महिन्याच्या कालावधीत वाढीव मावेजा रक्कम न्यायालयात जमा करण्यात येईल, या अटीवर कार सोडून देण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी सांगितले.

# पंकजा मुंडे यांना निवडून द्या अन्यथा काम घेऊन येऊ नका

माजलगाव( प्रतिनिधी) बाद झालेले लोक एक तर कारखाना काढतात किंवा किंवा वृत्तपत्र काढतात असा बौद्धिक कयास नितीन गडकरी यांनी व्यक्त केला ते आज भारतीय जनता पार्टीचा बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ माजलगाव येथील मोंढा मैदानावर बोलत होते

पुढे बोलताना गडकरी म्हणाले बीड लोकसभेतून भारतीय जनता पार्टीच्या पंकजा मुंडेंना निवडून द्या अन्यथा माझ्याकडे काम घेऊन येऊ नका असा धमकी वजा इशारा केंद्रीय बांध काम मंत्री नितीन गडकरी यांनी देत बाद झालेले लोक एकतर साखर कारखाना काढतात किंवा वृतपत्र काढतात असे म्हणताच लोक आवाक झाले कारण त्यांच्याच स्टेजवर चार कारखानदार उपस्थित होते उमेदवार पंकजाताई यांच्याकडेही साखर कारखाना आहेत मग बाद झालेलं कोण अशी चर्चा सभा संपल्यास जनतेत चालू होती गडकरी यांनी आपल्या कामाचा गवगवा करताना मोदी बाबत एक ब्रश शब्द काढला नाही अटल बिहारी वाजपेयी हे विकास पुरुष होते हा त्यांच्या बोलण्याचा हेतू होता यामुळे पंतप्रधान मोदी आणि नितीन गडकरी यांच्यात सख्य नाही हेही दिसून आले बाद झालेले लोक पेपर काढता किंवा कारखाना काढतात हा म्हणण्याचा हेतू कोणासाठी होता हे जरी समजू शकले नाही तरी त्यांच्या स्टेजवर बसलेले चार कारखानदार होते तर उमेदवार पंकजाताई कारखानदारच आहेत यामुळे जनतेने कोणाला बाद झालेले ठरवावे हा पेच सुज्ञ मतदारांसमोर पडलेला आहे यावेळी मोंढा मैदानावरील सभे स लाखोचा नाहीतर हजारोच जन समुदाय उपस्थित होता

आज मोंढा मैदानावरील नितीन गडकरी याच्या सभे वेळी मंचावर प्रकाश दादा, मोहन दादा, रमेश आडसकर, उमेदवार पंकजाताई हे चार कारखानदार होते यांना पाहून बाद झालेले लोक साखर कारखाना उभा करतात म्हणाले मग मतदान कोणाला करावे अशी लोक चर्चाकरत होते

### बाद झालेले लोक कारखाना काढतात किंवा वृत्तपत्र काढतात :- नितीन गडकरी



# जिल्ह्यातील जनतेचा संकल्प नवा आता खासदार वंचितचाच हवा

## कुठल्याही चळवळीत सक्रिय असणाऱ्या अशोक हिंगे पाटलांना संसदेत पाठवणार

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभेचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे अवघ्या दोन दिवसावर मतदान येऊन ठेपले आहे यामुळे बहुजन वंचित आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला आहे प्रत्येक मतदारांची घरी जाऊन भेट घेऊन वंचित आघाडीच्या कार्याची माहिती पटवून दिली जाते यामुळे मोठ्या प्रमाणात मतदार वंचित बहुजन आघाडीकडे आकर्षिले जाऊ लागल्या संकल्प नवा आता वंचितचाच खासदार हवा




असं कडा आष्टी केज तालुक्यातील मतदार जवळच्या मतदारांना स्वतःच सांगू लागले आहेत मतदारांनीच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा प्रचार हातात घेऊन वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना खासदार करून संसदेत पाठवायचं असा निर्धार व्यक्त करीत आहे एड. प्रकाश आंबेडकर यांचे गोरगरीब दलित दुबळे यांच्या प्रति असलेले निस्सीम प्रेम अवघ्या देशासह जनतेला ज्ञात आहे प्रकाश आंबेडकर हे चळवळीसाठी वाहून घेतलेले नेते आहेत म्हणून त्यांनी उमेदवारी देता नाही चळवळीत सक्रिय असणाऱ्या कार्यकर्त्यांनाच दिल्या आहे चळवळीतील कार्यकर्ता म्हणजे जो मांगने से नही मिलता ओ छीन कर हि ले सकता है म्हणून वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील हेही सक्रिय चळवळ करून उदयाला आलेलं नेतृत्व आहे संसदेत भांडून संघर्ष करून विकास कामे खेचून आणण्याची धमक अशोक हिंगे पाटील यांच्यामध्ये आहे म्हणून संकल्प नवा आता वंचितचाच खासदार हवा असं म्हणत सुज्ञ मतदारांनी प्रचार हातात घेऊन जवळच्या लोकांच्या भेटीगाठी घेऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून संसदेत पाठवायचा निर्धार कडा, आष्टी,पाटोदा, केज, गेवराई, माजलगाव, परळी, आंबेजोगाई, वडवणी, धारूर आधी तालुक्यातील मतदारांनी केला आहे त्यामुळे संचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित मानला जाऊ लागला आहे.

# आपलं अनमोल मत वाया घालवू नका..!

## पंकजाताईचा विजय निश्चित - राजेंद्र मस्के

बीड (प्रतिनिधी)

**राजकारणआणि समाजकारणात स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी बीड जिल्ह्याला वेगळी ओळख दिली. सर्व जाती धर्मातील गोर गरीब वंचित जनतेला बरोबर घेऊन मुंडे साहेबांनी राजकारण केलं. तोच वारसा घेऊन पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्याचं राजकारण केले. विकासातील त्यांचे योगदान विसरता येणार नाहीत.जिल्ह्याचा परिपूर्ण विकास डोळ्यासमोर ठेवून सजग मतदार बांधवांनी पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्याचा संकल्प केला आहे.**

प्रत्येक गाव खेड्यात आणि घराघरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कर्तृत्व, भारतीय जनता पार्टीचे चिन्ह कमळ, आणि पंकजाताई मुंडे यांची विकासाची शिदोरी गेलेली असल्याने लोकनेते पंकजाताई मुंडे



यांचा विजय कोणी रोखू शकत नाही असा विश्वास भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील बहादरपुर येथील कॉर्नर बैठकीत व्यक्त केला.

या बैठकीस विस्तारक शांतिनाथ डोरले, भाजप युवा नेते शिवराम शिरगिरे यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.लोकशाही मध्ये कोणत्याही एका जातीच्या बळावर राजकीय यश संपादन करता येत नाही. अथवा विकास साध्य करता येत नाही. सर्वांचा पुढाकार आणि सर्वांचा विश्वास हाच राजकारणाचा आत्मा आहे. आज बीड लोकसभा मतदारसंघ अफवा आणि जातीय विचाराने दूषित झाला. सामाजिक सलोख्या साठी बाब गंभीर असून, विकासाच्या राजकारणाला बाधक आहे. लोकशाहीने दिलेला मतदानाचा मौलिक अधिकार सर्वांनीच बजावला पाहिजे. आपले मत वाया जाणार नाही याचीही काळजी नागरिकांनी घेतली पाहिजे. देशाचं धोरण आणि हित ठरवणारी ही निवडणूक असून या निवडणुकी कडे संकुचित भावनेतून कोणीही पाहू नये. सुजाण मतदार बांधवांनी येत्या १३ मे रोजी कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले.

## पेठ बीड भागात डोअर टू डोअर प्रचार

# बजरंग सोनवणेंना विजयी करा: अजिंक्य चांदणे

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभेचा प्रचार अंतिम टप्प्यात आलेला असून सर्व राजकीय नेते आपापल्या भागामध्ये प्रचार करताना दिसत आहेत. डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी स्वतः राहत असलेल्या पेठ बीड विभागांमध्ये डोर टूडोर जाऊन महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासाठी मतदानाचे आवाहन केले. तुतारी वाजवत असलेल्या माणसासमोर बटन दाबून बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताने विजयी करा असे आवाहन अजिंक्य चांदणे यांनी केले आहे. पेठ बीड भागामध्ये कष्टकरी कामगार वर्ग व दलित मुस्लिम वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्या दारावर जाऊन चांदणे स्वतः प्रचार करत आहेत. देशाचे संविधान संपवू पाहणाऱ्या भाजपला सत्तेतून खाली खेचण्याची हीच ती खरी वेळ आहे. आजपर्यंत बीडच्या जनतेने मुंडे कुटुंबाला सत्तेत घेऊन जाण्याचे काम केले. मात्र असे असतांना बीडला त्याचा काहीही फायदा झालेला नाही. बेरोजगारी आणि




ऊसतोड कामगार, श्रमिक, कष्टकरी यांचे प्रश्न जशाच तसे आहेत. देशात भाजपमुळे हुकूमशाही वाढली आहे. वाटोळ्याचे कायदे पारित केले जात आहेत. विरोधात कोणी गेले तर त्याला तुरुंगात टाकले जात आहे. भाजपला रोखायचे असेल तर त्यांना मत करू नका, त्यामुळे आता शेतकरी कुटुंबातील सामान्य व्यक्ती बजरंग सोनवणे यांना लोकसभेत पाठविण्यासाठी मतदार विजयी करावे असे आवाहन अजिंक्य चण्डे यांनी प्रचारादरम्यान केले.

# बीड व गेवराई मतदार संघातून बजरंगबप्पा सोनवणे यांना एक लाखाचे मताधिक्य मिळणार - ॲड.चंद्रकांत नवले

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यापासून ॲड.चंद्रकांत नवले व त्यांच्या सहकार्यांनी बीड मतदार संघातील ग्रामीण भागातील १४० गावे-वाड्या, वस्ती, तांडे व गेवराई मतदार संघातील माळापूरी, धोंडराई, मादळमोही सर्कलमधील गावे पिंजून काढली असून ठिकठिकाणी प्रत्यक्ष गाठीभेटी घेवून बजरंग सोनवणे यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले आहे. एकंदर सर्वदूर चित्र पाहता ही निवडणूक पुढार्यांना झुगारुन लोकांनी हातात घेतली असून मराठा, धनगर, मुस्लिम, दलित व आठरापगड जातीतील लोकांनी सर्व मतभेद विसरुन घराणेशाही व झुंडशाही झुगारण्यासाठी एका सर्वसामान्य शेतकरी पुत्राला निवडून देण्याचा संकल्प केला आहे. बजरंगबप्पा सोनवणे यांच्यासारखा शेतकरी पुत्राने एका कारखान्याचे दोन कारखाने निर्माण करुन शेतकर्यानां न्याय दिलेला आहे. शेतकर्यांची जाण असलेल्या या पुत्राचा मतदारांनीच प्रचार हाती घेतला असून बजरंग सोनवणे यांना बीड आणि गेवराई मतदार संघातून एक लाखापेक्षा अधिक मतांची लीड मिळणार असल्याचा दावा ॲड.चंद्रकांत नवले यांनी आपल्या ठिकठिकाणच्या प्रचार सभेच्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

ॲड.चंद्रकांत नवले यांनी व त्यांच्या सहकार्यांनी रायमोहा, येवलवाडी, नागरेचीवाडी, हिवरसिंगा, मलकाचीवाडी, शिरापुर धुमाळ, शिरापूर गात, फुलसांगवी, बाजीपूर, जानपीर, जांब, खांबा लिंबा, खालापूरी, आर्वी, पौंडूळ १,२,३, कमलेश्वर धानोरा, फुलसांगवी, मार्कडवाडी, सा.पिंप्री, फुलसांगवी, केतुरा, उमरद जहाँगीर, सोनगाव, तांदळवाडी भिल्ल, तळेगाव, काकडहिरा, बेलखंडी, पाटोदा, मंजेरी, कर्झनी, पिंपळवाडी, सुर्याचीवाडी, डोकेवाडा, देवर्याचीवाडी, कदमवाडी, चर्हाटा, धुमाळवाडी, मेगळवाडी, जाधववाडी, पालवण, वरवटी, धानोरा, पाली, आहेर वडगाव, कोल्हारवाडी, समानापूर, खांडे पारगाव, नागापूर (बु.), नागापूर (खु.), उमरी, म्हाळस पिंपळगाव, काळेगाव, चिंचोली माळी,म्हाळस जवळा, अंथरवणपिंप्री, नाळवंडी, पोखरी मैंदा व घारवटी, चौसाळा,



अंजनवती, लिंबा गणेश, गोलंग्री, बोरखेड, मुळूक, महाजनवाडी सह सर्वदूर गावे पिंजून काढले असून गावागावात मतदारांनी त्यांचे उत्स्फुर्त स्वागत केले असून बजरंग सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी त्यांच्या समवेत विलास महाराज शिंदे शिवसेना जिल्हा संघटक, बाळासाहेब मोरे, सुधीरराव सुपेकर, भरत जाधव शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख, बापुराव येळे, सुनील जाधव, प्रभाकर जाधव, पांडुरंग भोसले, मच्छिंद्र शिंदे, आसाराम आमटे, विकास साळुंके, मच्छिंद्र शिंदे, जालिंदर साळुंके, विक्रम साळुंके, हनुमान शेलार, श्रीधरराव उकांडे, शहादेव घोडके, दत्ताभाऊ लंबाटे, रामेश्वर कुंभारकर, बिभीषण चव्हाण, रोहिदास कदम, हरिभाऊ जगताप, मनिष भोसकर, रामचंद्र वीर, लक्ष्मणराव काटे, वडजीराम घाडगे, नामदेवराव शेळके, भगवानराव तिपटे, बबनराव बहीर, अशोकराव पानसंबळ, ईश्वर शिंदे, लक्ष्मणराव घोलप, परमेश्वरराव डोंगर, दादाहरी जोगदंड, त्रिंबकराव आबदार, गणेश बनसोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीडजवळील उड्डाणपूल, स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावणार -ना.नितीन गडकरी

## रा.काँ.चे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीची घेतली दखल

बीड (प्रतिनिधी)

शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावणार असल्याची घोषणा रस्ते, वाहतूक व दळणवळण केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ना.नितीन गडकरींना विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मागण्यांची दखल घेऊन ना.गडकरी यांनी ही घोषणा केली.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांची माजलगाव येथे शुक्रवारी (दि.१०) जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर ना.गडकरी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पंकजाताई मुंडे यांच्यासह भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ.प्रकाश सोळंके, आ.लक्ष्मण पवार आदींची उपस्थिती होती.डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, सोलापूर-धुळे (एन.एच.५२) महामार्गावर बीडजवळ छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने महालक्ष्मी चौक व सोलापूरच्या दिशेने छत्रपती संभाजी महाराज चौक येथे अपघात वाढले आहेत. प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने व दळणवळणच्या दृष्टीने या दोन्ही ठिकाणी उड्डानपूल करणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाला यापूर्वीही निवेदन दिले आहे. तसेच, बीड बायपासकडून तेलगावकडे जाणारा आणि पिंपळनेरकडे जाणारा स्लिप रोड करणे गरजेचे आहे. हा बीडकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवावा, अशी




विनंती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ना.नितीन गडकरी यांच्याकडे केली. दरम्यान, मागणीची दखल घेऊन ना.गडकरी यांनी आपल्या भाषणात बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, मी बीडजवळील उड्डाणपुलासह स्लीप रोडचा प्रश्न मार्गी लावणारच, अशी घोषणा त्यांनी केली.

डॉ.योगेश क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा; अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडेंची शिफारस

परळी येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमात आलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाकडे शिफारस केली होती. तसेच, पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना.नितीन गडकरींच्या कानावर घातला. उड्डाणपूल, स्लिप रोडसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सातत्याने सुरू आहे. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत आहे.

# संतुआई देवीची आज पासून तीन दिवस यात्रा

गेवराई (प्रतिनिधी)

दि.११ मे शुक्रवार रोजी गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील ग्रामदैवत सुभान संतुआई देवीची यात्रा दि. १२ व दि.१४ मे रोजी संपन्न होत असून. यात्रे निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रे निमित्त होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे.

सिरसमार्ग येथे यात्रेसाठी पंचक्रोशीमधून हजारो भाविक येत असतात. यात्रे निमित्त याही वर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १० मे वार शुक्रवार रोजी अक्षय तृतिया दिवशी गंगचे पाणी आणण्यासाठी गावातून वाजता गाजत तरुण शनीचे राक्षसभुवन येथे पाठवले आहे. दि. ११मे वार शनिवार रोजी कावडीचे आगमन देवी परिसरात होणार आहे. दि. १२ मे वार रविवार रोजी गावातील देव देवताना स्नान घालण्यात येणार आहे. रात्री देवीची पालखी



(छबीना) मिरवणूक होणार आहे. मंगळवारी १४ मे रोजी तीन वाजता देवी परिसरात कुस्त्याचीदंगल होणार आहे. या मध्ये १० रुपया पासून १५०० रुपया पर्यंत बक्षीस देण्यात येणार आहेत.


# धनंजय मुंडेंचे निवडणुकीतही पाण्यासाठी प्रयत्न, माजलगाव धरणातून सिंदफणा नदीपात्रात सोडले पाणी

सिंदफणा काठच्या गावांना लाभ; ग्रामस्थांच्या मागणीला यश, पालकमंत्र्यांचे मानले आभार

माजलगाव (प्रतिनिधी)

पिण्याला पाणी नाही, जनावरांना पाण्याची अडचण, ऊस वाळतोय त्यामुळे पालकमंत्री महोदय, सिंदफणा नदी पात्रात माजलगाव धरणातून पाणी सोडण्याबाबत कार्यवाही करा; अशा पद्धतीची विनंती माजलगाव तालुक्यातील काही गावातील ग्रामस्थांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांना केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन केले आणि अवघ्या दोन दिवसातच सिंदफणा नदीपात्रात माजलगाव धरणातून पाणी सोडण्यात आले आहे.

माजलगाव तालुक्यातील शिंपे टाकळी, रोशन पुरी, नागडगाव, सांडस चिंचोली, मनूर, लुकेगाव, दिपेगाव आदी गावातील ग्रामस्थांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे माजलगाव धरणातून पाणी सोडण्याबाबत विनंती केली होती. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी तातडीने माजलगाव धरणातील उपलब्ध जलसाठा तसेच धरणातून पुढे जाणाऱ्या रोशनपुरी बंधाऱ्यासह विविध गावांना मिळावयाच्या लाभाचा तातडीने विचार करून माजलगाव धरणातून पुढे पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाचे सचिव तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून सूचना केल्या होत्या. त्यानुसार आदर्श



आचारसंहितेचे पालन करत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्याबाबतचा निर्णय घेतला असून, आज सकाळी प्रत्यक्ष पाणी सोडण्यात आले आहे.

दरम्यान वरील गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासह जनावरांना पिण्याचे पाणी, उभे पिके, आदींना या पाण्याचा लाभ होणार असून एकीकडे लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापलेले असताना कोणत्याही परिस्थितीत जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची वृत्ती लक्षात घेत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी तातडीने पाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल संबंधित ग्रामस्थांकडून पालकमंत्री धनंजय मुंडे , प्रकाशदादा सोळंके यांसह संबंधित सर्वांचेच आभार व्यक्त केले जात आहेत.

# अल्ताफ शेख यांनी संगीत दिलेल्या लोरी हिंदी चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड (प्रतिनिधी)

सोलापूर जिल्ह्यातील छोट्याशा ग्रामीण भागातून पुणे सारख्या मोठ्या शहरात जाऊन चित्रपट दिग्दर्शनाचे बारकावे शिकून दिग्दर्शनासह कथा, पटकथा व गीत लेखन करत चंदेरी दुनियेत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे बीड जिल्ह्याचे जावई अल्ताफ दादासाहेब शेख यांनी लोरी या हिंदी चित्रपटापासून संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही पदार्पण केले. त्यांच्या मेहनतीचे येथेही सोने झाले असून त्यांनी प्रथमच संगीत दिलेला लोरी हा हिंदी चित्रपट संपूर्ण देशभरासह बीड शहरातील संतोषीमाता चित्रमंदिर व आशा टॉकीज येथेही प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला व याच्या गीत संगीतालाही प्रेक्षकांचा उत्स्फूर्त




प्रतिसाद मिळत असून चित्रपट चांगली गर्दी खेचत आहे.

अल्ताफ शेख यांनी पदार्पणातच सुमधूर संगीत दिल्याने अभिनेत्री जागृती जाधव आणि खोपोली महानगरपालिकेचे अधिकारी जाधव यांनी अल्ताफ शेख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. लोरी महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने पाच दिवसांत साडेचार कोटींचा गल्ला जमा केला आहे. माऊथ पब्लिसिटीमुळे चित्रपट दुसऱ्या आठवड्यात सिनेमागृहात अजून जास्त गर्दी खेचेल असा अंदाज आहे. चित्रपटातील उर्मिला धनगरी यांनी गायलेल्या हुक्का बड़ा नशीला आणि सुप्रसिद्ध अनुभवी पार्श्वगायक सुरेश वाडकर यांनी गायिलेले ममता की मुरत ही गाणी प्रेक्षकांच्या चांगल्याच पसंतीस उतरली आहेत. याच्या संगीत दिग्दर्शनासह गीते ही अल्ताफ शेख यांनीच लिहिली आहेत. चित्रपटाची निर्मिती अविनाश कवठणकर आणि राजू रेवणकर यांनी साईराम अ क्रिएटिव्ह वर्ल्ड या बॅनर खाली केली असून चित्रपटाची कथा, पटकथा, गीत, संगीत आणि कलाकारांनी केलेला उत्तम अभिनय प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे.

# जिजाऊ , ज्ञानराधा मल्टीस्टेट, साई अर्बनच्या सर्व ठेवीदारांना न्याय मिळवून देणार

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात गेल्या सहा महिन्यापासून खाजगी बँका नी गोरगरीब जनतेच्या ठेवी घेऊन पळून जाण्याचे प्रकार घडल्या मुळे ठेवीदार हवालदिल झाले आहेत मॉंसाहेब जिजाऊ बँक, ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम अर्बन च्या सर्व ठेवीदारांना न्याय मिळवून देणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी ठेवीदाराच्पा बैठकीत सांगितले आहे



हिंगे पाटील पुढे म्हणाले की सहा महिन्यापासून खाजगी बँका ठेवी दराच्या ठेवी घेऊन पळून जात आहेत याबाबत कुठलाही लोकप्रतिनिधी बोलत नाही जिल्हा प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदन दिली आंदोलन केली . मॉ साहेब जिजाऊ पतसंस्थे चे अध्यक्ष बबन शिंदे ठेवीदाराचे सर्व पैसे घेऊन पसार झाले होते अनेक निवेदन आंदोलन करून ठेवीदारांच्या खांदयाला खांधा देऊन मी संघर्ष उभा केला पाठीशी खंबीरपणे उभा राहिलो तेव्हा बबन शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल झाला मात्र अटक झाली नाही या घोटाळ्यातील आरोपींना अंटक करण्यासाठी एस आय टी लावण्यासाठी प्रयत्न केला. ज्ञानराधा,साईराम राजस्थानी मल्टीस्टेट गेली अनेक दिवसापासून ठेवीदारांचे पैसे देण्यास टाळाटाळ करत आहे ज्ञानराधा मल्टीस्टेट चे कुटे यांच्या कडून तारखांवर तारखा मिळत आहेत मात्र गरीब जनतेचे पैसे दिले जात नाहीत साई राम अर्बन मध्येही असे च प्रकार घडत आहेत ठेवीदराचे पैसे देण्यासाठी तारखा मागून तारखा दिल्या जातात परंतु वेळेवर ठेवी मिळत नसल्यामुळे ठेवीदार घाबरून जातं आहेत मात्र घाबरून न जाता ठेवीदारांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीमागे उभे राहावे बीड लोकसभेत खासदार म्हणून मला संसदेत पाठवा माझ्या गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून मला प्रचंड मताने विजयी करा मला मतदान रुपी आशीर्वाद द्या. गरिबांची लूट आणि बँका नां सूट हे धोरण मी थांबावतो वरील तीनही पतसंस्था मधील ठेवी मिळवून देण्यासाठी मी सदैव आपल्या सोबत राहील असे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले वेळप्रसंगी ठेविदारांच्या न्याय मागणीसाठी ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ठेवीदाराची याचिका उच्च न्यायालयात दाखल करून निशुल्क न्यायालयीन लढाई लढली जाईल आम्ही सत्तेत असो किंवा नसो सतत सत्यासाठी आणि न्यायासाठी संघर्ष करीत आलेलो आहे त्यामुळे येणाऱ्या काळातही सत्यासाठी आणि न्यायासाठी सदैव गोर गरीबा जनतेची साथ देणार आहे न्याय मिळवून देणारा आहे म्हणून येणाऱ्या १३ तारखेला गॅस सिलेंडर या चिन्हा समोरील बटण दाबून मला मतदान रुपी आशीर्वाद द्या व मला संसदेत पाठवा आपल्याला न्याय मिळवून देण्याची हमी देतो आसे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले

# शिवसंग्रामच्या बीड शहराध्यक्षपदी सुहास पाटील व बीड विधानसभा प्रमुखपदी प्रा. सुभाष जाधव यांची निवड

**बीड (प्रतिनिधी)**

**शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ . ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसंग्रामचे प्रदेशाध्यक्ष मा. तानाजीराव शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद यांनी शिवसंग्राम बीड शहर अध्यक्षपदी श्री सुहास पाटील यांची तर प्रा.सुभाष जाधव यांची विधानसभा प्रमुखपदी निवड केली. शिवसंग्राम परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या .**

शिवसंग्राम संघटनेच्या स्थापनेचे साक्षीदार असणारे निष्ठावंत कार्यकर्ते लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांचे खंदे समर्थक, माजी नगरसेवक तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक सुहास आबा पाटील यांची शिवसंग्राम बीड शहराध्यक्षपदी



निवड जाहीर करण्यात आली.स्व.मेटे साहेबांचे सहकारी संघर्षाचे साक्षीदार तसेच आजपर्यंत मेटे परिवाराशी एकनिष्ठ असलेले सुहास आबा पाटील यांची नुकतीच प्रदेश कार्यकारिणी व शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण दादा काशीद यांनी बीड शहराध्यपदी त्यांची निवड केली आहे. प्रत्येक कार्यक्रमांमध्ये शहरातील सामाजिक - राजकीय - सांस्कृतिक - व्यावसायिक विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रत्यक्षपणे ओळख असणारे तसेच बीड शहरातील एक चांगले व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे . त्यांच्या कार्याचा लेखाजोखा पाहता आज त्यांची बीड शहराध्यक्षपदी निवड करत शिवसंग्रामने त्यांना सन्मान केला . तसेच शिवसंग्रामचे प्रा.सुभाष जाधव सर यांची बीड विधानसभा प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. लोकनेते मेटे साहेबांच्या सामाजिक चळवळीचे साक्षीदार व बालाघाटावरील प्रतिथयश प्राप्त असणारे, समाजातील प्रत्येक घटकाशी मैत्रीपूर्ण संबंध असणारे व्यक्तिमत्व म्हणून प्रा. सुभाष जाधव सर यांची ओळख आहे.खऱ्या अर्थाने डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या माध्यमातून शिवसंग्रामला या निवडीने नवीन बळ मिळत आहे. नवीन जोमाने काम करण्यासाठी शिवसंग्राम आता सज्ज होत आहे. शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे प्रदेशाध्यक्ष मा. तानाजीराव शिंदे , ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे,

शहर प्रभारी अनिल घुमरे तसेच शिवसंग्राम परिवाराच्या वतीने सुहास पाटील व प्रा. सुभाष जाधव सर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# बजरंग बप्पाच्या विजयासाठी शेतकरी कन्या पूजा मोरे यांनी जिल्हा पिंजुन काढला

## बाप्पाच्या विजयात कु पुजा ताई चा राहणार खारीचा वाटा

सुमेध करडे ।तलवाडा

मराठा क्रांती मोर्चातून घडलेलं नेतृत्व, उच्चविद्याविभूषित,माजी पंचायत समिती सदस्या कु. पुजा ताई मोरे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी अक्षरशः गेवराई विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला.

मुळातच कु. पुजा ताई मोरे यांची जनसामान्यांशी नाळ कायमच जोडलेली. शेतकरी, कष्टकरी कुटुंबांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवतात. मध्यंतरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे काही दिवस काम केले. शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या खऱ्या प्रश्नांची जाण त्यांना होती म्हणून; स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षा म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

आता कु. पुजा ताई मोरे यांनी शरदचंद्र पवार साहेब यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. त्यांची शेतकरी, कष्टकरी व महिलांच्या प्रतीची तळमळ पाहता पक्षाने पहिल्यांदाच एका युवतीला किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षापदी नियुक्ती केली असून; ही बाब बीड जिल्ह्यासाठी भुषवाह आहे. बीड जिल्ह्यात खूप साऱ्या पक्षाने प्रदेशाध्यक्ष पदे भूषविले आहेत. त्यामधे कु. पुजा ताई मोरे यांचाही नवयुवतीचा एक समावेश होतो.



गेवराई विधानसभा मतदार संघात त्यांची शेतकरी, वृद्ध, कष्टकरी,युवा, महिलांसोबत जोडलेली नाळ बजरंग सोनवणे यांना येणाऱ्या १३ तारखेच्या निवडणुकीत आशीर्वादरुपी मतदानाने नक्कीच होणार असून; पुजा ताई मोरे गेवराई विधानसभा मतदारसंघात बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासाठी किंगमेकर ठरतील.गेल्या अनेक वर्षापासून पूजाताई मोरे सामाजिक कार्य नेहमी अग्रेसर असतात सर्वात सामान्य जनतेत मिळून मिसळून राहतात शेतकऱ्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी कित्येक वर्षापासून बीजेपी विरोधात आवाज उठवला होता त्यासाठी त्यांच्यावर आक्रमक आंदोलनाचा पवित्रा घेत गुन्हे देखील दाखल झालेले आहेत त्यांचे आंदोलन कुठेही असले सामान्य जनता स्वखर्चातून आंदोलन स्थळी जात असते ही त्यांची लोकप्रियता तालुक्यात दिसून येत आहेत तालुक्यासह जिल्ह्यात त्यांचा दांडगा संपर्क असून बजरंग बाप्पाच्या विजयात त्यांचा खारीचा तरी वाटा नक्कीच असेल बजरंग बाप्पाच्या प्रचारासाठी सकाळी आठ वाजता घराबाहेर पडत असून रात्री एक वाजता घरी येतात दोन-चार घंटे झोप घेऊन पुन्हा त्या प्रचारासाठी रवाना होतात जिल्ह्यात खेड्यापाड्यासह दांडगा संपर्क असल्यामुळे बजरंग बाप्पाचा विजय आजच निश्चित मानला जात आहे.

# परळीतील मुस्लिम समाज बांधव गंगा-जमुना तहजीबचे आदर्श उदाहरण प्रस्थापित करणार - धनंजय मुंडे

## परळीत पंकजाताईंच्या प्रचारार्थ धनंजय मुंडेंची भर पावसात तुफान सभा

परळी (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ शहरात सर्व हिंदू - मुस्लिम बांधव एकोप्याने राहतात. दिवाळी-ईद असो वा पाण्याचा दुष्काळ असो की अगदी अलीकडच्या काळात आलेल्या कोविड महामारी मध्ये सुद्धा खांद्याला खांदा लावून आपण सर्वांनी एकमेकांना मदत केली. आपल्या या मदत व प्रेमाच्या नात्यात कधीही जात धर्म आडवे आले नाहीत. मी असेल, पंकजाताई असतील किंवा स्वर्गीय मुंडे साहेब असतील, आमच्या सेवा धर्मामध्ये कधीही जात धर्म आडवा आला नाही आणि शेवटच्या श्वासापर्यंत कधी येणारही नाही. इथल्या जनतेने भरभरून प्रेम दिलं आहे. इथल्या मुस्लिम बांधवांनी ईदच्या दिवशी मिठी मारण्यापासून ते मतदान रुपी आशीर्वाद देण्यापर्यंत मला वेळोवेळी पाठबळ दिलं आहे. आता हेच पाठबळ माझी बहीण पंकजाताई यांच्या पाठीशी उभं करायचं असून त्यासाठी आपल्या सर्वांच्या मतदान रुपी आशीर्वादाने परळीतील मुस्लिम समाज बांधव हे समस्त देशासमोर गंगा - जमुना तहजीबचे आदर्श उदाहरण प्रस्थापित करणार असल्याचा विश्वास कृषी मंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते धनंजय मुंडे यांनी परळी येथील बरकत नगर भागात संपन्न झालेल्या सभेत बोलताना व्यक्त केला आहे.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ काल सायंकाळी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळी वैद्यनाथ शहरातील बरकत नगर भागात भर पावसात धनंजय मुंडे यांची तुफान सभा पार पडली. एकीकडे डोक्यावर कोसळणारा अवकाळी पाऊस तर दुसरीकडे 'धनंजय मुंडे आप आगे बढो', 'पंकजाताई आप आगे बढो...' अशा जोश पूर्ण घोषणा यामुळे एकूणच वातावरण अत्यंत उत्साहवर्धक बनले होते. स्व. गोपीनाथराव



मुंडे तसेच माझे वडील स्व. पंडित अण्णा मुंडे यांचे आणि मुस्लिम समाजाचे अतूट प्रेम बंध होते. आम्हीही पुढच्या पिढीमध्ये तोच भाव जपला आहे. त्यामुळेच इथे आमचे समाजकारण व राजकारण हे जात-पात आणि धर्माच्या पलीकडच्या आहे हे सर्वांना ठाऊक आहे. आज मनामनात जाती-धर्माच्या नावावरून बुद्धिभेद पसरवला जात असताना परळीतील मुस्लिम समाज मात्र केवळ आणि केवळ विकासाच्याच पाठीशी उभा राहील असा मला विश्वास असल्याचेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले.

नुकतीच शिरसाळा एमआयडीसी उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आगामी काळात परळी वैजनाथ शहर व तालुक्यामध्ये वेगवेगळ्या उद्योगांची उभारणी त्यातून केली जाणार आहे. रोजगारांची निर्मिती, वेगवेगळे प्रकल्प अशा माध्यमातून आपल्या भागात मोठ्या प्रमाणात विकास साधला जावा यासाठी केंद्र सरकारमध्ये आपल्या हक्काचा माणूस असावा म्हणून पंकजाताईंना निवडून देणे हे परळीकरांचे आद्य कर्तव्य आहे; असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

बरकत नगर असेल किंवा परळी शहरातील कोणताही भाग असेल, प्रत्येक वार्ड, प्रत्येक बूथ वरून मला प्रत्येक निवडणुकीत आजवर परळी शहरवासीयांनी आणि माझ्या तमाम मुस्लिम बांधवांनी मोठ्या प्रमाणात मतांची लीड दिलेली आहे. पण त्याहीपेक्षा किमान दहा मतांची लीड प्रत्येक बूथ वरून पंकजाताईला मिळावी; अशी अपेक्षाही धनंजय मुंडे यांनी भर पावसात बोलताना केली.

यावेळी रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,माजी उपनगराध्यक्ष आय्युबभाई पठाण,शकील कुरेशी, राजा खान,इस्माईल पटेल,शहर सरचिटणीस अनंत इंगळे, शंकर आडेपवार, विजय भोयटे,नाजेर हुसेन, अल्ताफ पठाण, रवि मुळे, शेख शम्मो, लालाखान पठाण यांसह मोठया प्रमाणात स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# पंकजाताई मुंडेंना सभेला घेऊन जाण्यासाठी खा. सुजय विखे पाटील स्वत: हेलीकॉप्टर घेऊन माजलगावला आले..!

**पाथर्डीच्या विराट सभेत विखे पाटलांच्या विजयावर पंकजाताईनी मारला शिक्का**

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभा मतदार संघात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या जाहीर सभेशिवाय माझ्या विजय निश्चित होऊ शकत नाही. तेव्हा अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान खा. सुजय विखे पाटील हे स्वत: हेलीकॉप्टर घेऊन माजलगावात ताईंना घेऊन जाण्यासाठी आले. मंत्री नितीन गडकरींची सभा संपताच वादळ वारा सुरू असताना त्या हेलीकॉप्टरने नगरला गेल्या आणि विखे पाटलांसाठी जाहीर सभा घेत विजय निश्चित केला.

राज्यात अनेक लोकसभा मतदार संघातून पंकजाताई मुंडे यांच्या सभेला मागणी होत असून, त्यांच्या सभे शिवाय आपला विजय निश्चित होऊ शकत नाही. अशी अनेक उमेदवारांची भूमिका समोर येते. मध्यंतरी बुलढाणा लोकसभा मतदार संघात खा. प्रताप जाधव यांनी त्यांचा विजय निश्चित करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा घेतली तिथे जाधवांचा

## पंकजाताई मुंडे यांच्या सभेशिवाय विजय निश्चित होऊ शकत नाही, राज्यात अनेक उमेदवारांची भूमिका ..!

विजय निश्चित झाला. राज्यात अनेक ठिकाणी त्यांना मानणारा वर्ग असून, सभेची मागणी होताना दिसते. माजलगावात नितीन गडकरी यांची सभा त्यासाठी उमेदवार म्हणून पंकजाताई उपस्थित होत्या. काही दिवसांपूर्वीच त्यांनी नगरला सुजय विखे पाटलांना येण्याचा शब्द दिला होता. कारण त्या मतदार संघात पंकजाताई शिवाय विजय निश्चित होऊ शकत नाही. असे राजकीय संकेत आहेत. २०१९ च्या निवडणुकीत देखील त्यांनी नगर जिल्ह्यात जाऊन विखे पाटलांसाठी सभा घेतल्या ज्यामुळे ते विजयी झाले होते. तस पाहता यंदा पंकजाताई स्वत: च उमेदवार बीड लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. प्रचारात व्यस्त असताना अचानक नगरचे उमेदवार खा. सुजय विखे पाटील माजलगावात पंकजाताईला घेऊन जाण्यासाठी खास हेलीकॉप्टर घेऊन आले. त्यांना दिलेला शब्द पूर्ण करताना आणि नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान पदी बसवण्यासाठी एक खासदार महत्वाचा हा दृष्टिकोण मनात ठेऊन हवामान चांगले नसताना वादळ वाऱ्यात सायंकाळी ४ वाजता पंकजाताईला घेऊंन हेलीकॉप्टर नगरच्या पाथर्डीसाठी टेकप झाल. त्या ठिकाणी पंकजाताईची विराट सभा झाली. ज्या सभेत त्यांनी सुजय विखेच्या विजयावर शिक्का मोर्तब केले. सांगायचे तात्पर्य एवढच आहे की एवढी मोठी राजकीय ताकत असलेल नेतृत्व बीड लोकसभा मतदार संघात निवडणूक लढवत आहे. हा खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यातील तमाम मतदार, सामान्य जनतेसाठी स्वाभिमान असून, उद्या त्यांना खासदार करूंन दिल्लीला पाठवले तर बीड जिल्ह्याचा विकास कसा होऊ शकेल, म्हणूच त्यांना निवडणू देण्यासाठी जिलहाभरात आता स्पर्धा लागलेली दिसते.

# गावागावात विकास रुजवण्यासाठी जाती-पाती नाही तर विकासाची क्षमता महत्वाची - धनंजय मुंडे

## पंकजाताईंच्या प्रचारार्थ धनंजय मुंडेंचा अंबाजोगाई तालुक्यात झंझावात

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मांजरा नदीचा पट्टा हा सधन आहे मात्र जिल्ह्यात सात लाख एक हजार पेक्षा अधिक शेती अजूनही जिरायती आहे. बीड जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी, इथला शेतकरी सधन व्हावा आणि त्यासाठी या जिल्ह्यात जलक्रांती व्हावी, या उद्देशाने गोदावरी तुटीचे १६५ टीएमसी चे खोरे भरून काढून मराठवाड्याची तहान भागवायची, त्याचबरोबर याद्वारे बीड जिल्ह्यात ४२ टीएमसी पाणी आणायचे आमचे स्वप्न आहे. याचा प्रस्ताव तयार असून यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकारचा निधी आणणे तसेच आवश्यकतेनुसार बँकांकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यातून सक्षम उमेदवाराला आपल्याला संशोधन पाठवायचे आहे. त्यामुळे इथे कोण आपला आणि कोण लोकांचा असा जातीपातीचा विचार न करता कोण कामाचा आहे असा विचार करून पंकजाताईंच्या पाठीशी मताधिक्य उभा करण्याची गरज असल्याचे मत कृषी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

धनंजय मुंडे यांनी आज अंबाजोगाई तालुक्यात झंजावाती दौरा करत धानोराडी तांडा रडी त्याचबरोबर उजनी जोडवाडी आदी गावांमध्ये संवाद बैठका घेतल्या तसेच त्यानंतर बर्दापूर या ठिकाणी कॉर्नर बैठकीस देखील संबोधित केले. या बैठकांच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत आपला विकासाचा अजेंडा सगळ्यांसमोर मांडला. समोरच्या उमेदवाराकडून आमच्यावर आरोप केले जातात, मात्र कृषी विभागाच्या माध्यमातून याच भागात मराठवाड्यातील पहिले सोयाबीन संशोधन व प्रक्रिया केंद्र उभारून त्याद्वारे रोजगार निर्मिती तसेच सोयाबीनला अधिक उत्पादन क्षमता व भाव मिळण्याची व्यवस्था मी केली आहे. येत्या वर्षभरात हे केंद्र उभे राहील. त्याची माहिती उमेदवारास नसावी, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी समोरच्या उमेदवाराचे व्यवसाय काय आहेत, ते आता संपूर्ण जिल्ह्याला कळले, अशी कोपरखळीही लगावली.

दरम्यान मराठा समाजाची आरक्षणाची मागणी



घेऊन मी मागील अनेक वर्षांपासून लढलो आहे हे सबंध राज्याला माहित आहे. आता मनोज जरांगे पाटील यांच्या प्रखर आंदोलनामुळे कुणबी प्रमाणपत्रांचा तिढा सुटला. जुन्या कुणबी नोंदी शोधून त्या आधारे कुणबी प्रमाणपत्र दिले जात आहेत. त्यामध्ये बीड जिल्हा मराठवाड्यात सर्वात पुढे असून आतापर्यंत ७८ हजार पेक्षा जास्त कुणबी प्रमाणपत्र जिल्ह्यात वाटप झाले आहेत. परंतु समोरच्या उमेदवाराने या आधारे स्वतःचा फायदा करून घेतला, इतर गरजवंतांच्या मदतीला मात्र ते गेले नाहीत, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

सकाळच्या सत्रात धानोरा, राडी तांडा, राडी या ठिकाणी संवाद बैठका संपन्न झाल्या, यावेळी ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, अच्युत बापू गंगणे, विलास काका सोनवणे, बबनभैय्या लोमटे, तानाजी देशमुख, बाळासाहेब देशमुख, वसंत कदम, आबासाहेब पांडे, मेघराज सोमवंशी, बालासाहेब सोमवंशी, मदन पाटील, श्रीकांत सोमवंशी, विलास जगताप, गुणवंत आगळे, रावसाहेब यादव, अविनाश उगले, पंडित सोमवंशी, सुधाकर काळुंखे, गोविंद जामदार, सुधाकर आगळे, मधुकर आगळे, दीपक अंधारे, डॉ. जोगदंड त्याचबरोबर मनोज गंगणे, सरपंच प्रशांत पाटील, मा. सभापती प्रदीप पाटील, बालासाहेब गंगणे, दत्ताभाऊ गंगणे, बालासाहेब बाप्पा गंगणे, दैठणाचे सरपंच अमोल गंगणे, विलास जगताप, प्रवीण जगताप, राडी तांड्याचे सरपंच रावसाहेब आडे, सोनेराव राठोड यांसह आदी उपस्थित होते.


सायंकाळच्या सत्रात बरदापुर येथे संपन्न झालेल्या कॉर्नर सभेस खा.डॉ.प्रितमताई मुंडे, मा.आ.संजय दौंड, यशवंत सेनेचे बाळासाहेब दोडतले, रा.कॉ चे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण,विलास बापू मोरे,अविनाश मोरे,विवेक मोरे पाटील,सरपंच विकास मोरे,बंडू शिंदे,नामदेव शिंदे,सुधाकर शिनगारे,बाबू भाई पटेल,लिंबराज धुमाळ,विठ्ठल कोकरे,धर्मराज धुमाळ,मुक्तार देशमुख, सिधु मोरे,सुमीत मोरे यांसह आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.प्रीतमताई मुंडे यांनीही आपले मत व्यक्त केले. पंकजाताई, धनुभाऊ किंवा मी असो, शेवटच्या श्वासापर्यंत जनतेची सेवा व या भागाचा विकास हेच आमचे ध्येय आहे, असे प्रीतमताई म्हणाल्या. मुंडे कुटुंब हे कायमच विकासाचे राजकारण करत आले आहे. आजच्या परिस्थितीत पंकजाताई यांच्या पाठीशी आपल्या भागातून जास्तीत जास्त मताधिक्य उभे करणे गरजेचे आहे, असे मत उजनी येथे बोलताना मा.आ.संजय दौंड यांनी व्यक्त केले.

## मतदानाचा हक्क बजवावा – कामरान खान

शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख

आपल्या हक्क आणि बीड जिल्ह्याचे विकासासाठी उज्वल भविष्य साठी सर्व कामे मागे ठेवून मतदान करावा. मतदान हा लोकशाहीतला हक्क आहे. आपला एक मत तरुणांना रोजगार देऊ शकतो आपले जिल्ह्याच्या बदल करू शकतो आपल्याला एक चांगला नेतृत्व निवडून देऊ शकतो आपला एक मत खूप महत्त्वाचा आहे त्यामुळे मतदानाच्या दिवशी आपला मत द्यावा या संधीचे सोने करत आपल्या शेजारी, संपर्कातील, नातेवाईक, मित्र या



सर्वांना मतदानासाठी घेऊन जाऊन आपणही मतदानाचा हक्क बजवावा आपल्या जिल्ह्याचे विकासासाठी मतदान बजवावा असा आव्हान शिवसेना अल्पसंख्या जिल्हाप्रमुख कामरान खान यांनी केला.

## कालिकादेवीच्या आराधना कार्यक्रमाची झाली सांगता

### ढक्कू भाकरीचा खमंग स्वाद पुढच्या वर्षीच चाखायला मिळणार

शिरूर कासार (प्रतिनिधी)

तालुक्यातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या कालिकादेवीच्या आराधना कार्यक्रमाची आज अमावस्याच्या दिवशी सांगता झाली आहे.बाजरीची गरम भाकरी खमंग ढक्कुचा आस्वाद भाविकांना आता थेट पुढील वर्षीच चाखायला मिळणार आहे. अष्टमीच्या निमीत्ताने दरवर्षी देवीच्या आराधना कार्यक्रमाची सुरुवात होते.पहिल्या दिवशी सार्वजनिक आराधना होऊन या कार्यक्रमाला मोठ्या उत्साहात सुरुवात होते.त्यानंतर जवळपास एक महिना हा कार्यक्रम सुरूच राहतो.आपली नवसपूर्ती करण्यासाठी किंवा व्हावी म्हणून भाविक मनोभावे देवीच्या आराधनाचा कार्यक्रम करतात.ज्या दिवशी आराधनाचा कार्यक्रम असतो त्या दिवशी यजमानाच्या वतीने संपूर्ण शहरातील सुवासिनी महिलांना हळदी कुंकू लावून निमंत्रण देण्यात येते.दुपारी बारा वाजता सर्व सुवासिनी महिला जेवणाचा आस्वाद घेतात.त्यानंतर पुरुष मंडळी जेवणासाठी बसतात.दुपारी बारा ते चार पर्यंत जेवणाची पंगत सुरू राहते. सार्वजनीक घंटा वाजवून सर्व भावीक भकताना आमंत्रीत करण्यात येते एक दोन दिवसाआड आराधनाची पंगत मंदिरात होत असते.शिरूर कासारसह



तालुक्यातील भाविक मोठ्या आवडीने प्रसाद घेण्यासाठी उपस्थित राहतात.

या पदार्थांचा असतो समावेश

आराधना कार्यक्रमात ढक्कु भाकरीसह लापशी, कडी,भात आणि दाळ बट्टी असा जेवणाचा सुंदर आणि रुचकर बेत असतो..सोबतीला कांदा,काकडी,लोणचे, शेंगदाणे,कैरी हे साहित्य देखील जेवणाची चव वाढविण्यासाठी आणल्या जाते.एवढा उपहार घेतल्यानंतर भाविक मोठ्या आवडीने तृप्तीचा ढेकर देतात.अश्या प्रकारे चालनारा हा उपक्रम अत्यात भक्ती भावाने आजच्या भातालापशी कढी च्या मिस्टान्नानेपारपडली

# पंकजा केवळ मुंडे साहेबांची मुलगी म्हणून नाही.. तर कर्तृत्व आणि नेतृत्व तेवढेच मोठे असल्याने जिल्ह्याचा आणि राज्याचा विकास करेल ...!

## तुम्ही पंकजाताईंना खासदार करा, मोदीजी आणि मी डबल इंजिन लावून बीड जिल्हा विकास कामात देशात नंबर एकचा करू..!

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माजलगावात जाहीर सभा

बीड (प्रतिनिधी)

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरीनी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी माजलगावच्या मोंढा मैदानावर जाहीर सभा घेतली. त्यात बोलताना पंकजाताईंना तुम्ही खासदार करा या जिल्ह्याच्या विकासाची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मी स्वत: घेत पालकत्व स्वीकारतो. विकसाच्या प्रक्रियेत बीड जिल्हा देशात नंबर एकचा करून दाखवू हे सांगताना पंकजा केवळ स्व. गोपीनाथ मुंडेची मुलगी म्हणून नव्हे तर तिने राजकारणात आपले कर्तृत्व आणि नेतृत्व सिद्ध करू दाखवले. मोदीजी आणि मी स्वत: डबल इंजिनच्या रूपाने तिच्या पाठीमागे खंबीर पणे उभा राहू हे सांगताना

तुम्ही पंकजाताईला दिल्लीला पाठवले तर जिल्ह्यासह राज्याच्या विकासाची ललकार बनवू शकते, कारण विकासासाठी सत्ते सोबत संघर्ष करण्यासाठी तिच्यात क्षमता आहे. राजकारणात माणूस जातीने नाही तर गुणाने मोठा होतो हे सांगताना छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन काम करतो. जो करेगा जात की बात, उसको पडेगी भारी लाथ असे सांगत त्यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे हे खऱ्या अर्थाने सामान्य जनतेचे नेते होते. मुंडे- महाजनामुळे राज्यात भाजपाचा विस्तार झाला. माझ्याही राजकीय आयुष्यात त्यांचे मार्गदर्शन लाभले.

आपल्या विस्तारीत भाषणात बोलताना सुरवातीलाच गडकरी म्हणाले काँग्रेस ने देशात ६० वर्ष व्यवस्था चालवताना गरीबी हटवाचा नुसता नारा दिला. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी वीस कलमी कार्यक्रम हाती घेतल्याचे सांगत देशातील सामान्य जनतेला विकासापासून वंचित ठेवले. मात्र अवघ्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसने जे ६० वर्षात केले नाही, ते करून दाखवताना सबका साथ सबका विकास सर्व स्तरावर सर्वांगीण विकास करताना या प्रक्रियेत गरीब माणसाला आणून सोडले. देशाची प्रगती खऱ्या अर्थाने यांच्या काळात झाली. कदाचित जास्तीचा विकास केला म्हणूच इंडि आघाडीवाले आमच्यावर बेताल आरोप करतात असे ते म्हणाले.

बीड जिल्ह्यातल्या रस्ते विकासावर मी बोलणार नाही कारण आम्ही काय काम केले हा अनुभव तुम्ही घेतलाच असल्याचे सांगत त्यांनी खासदार प्रीतमताई यांनी पुढाकार घेतलेल्या पकजाताईच्या एका पत्रावर जिल्ह्यातील दहा हजार कोटी रुपये खर्चाच्या रस्ते विकास कामाला मंजूरी दिल्याचे सांगितले. कामाची यादी वाचुंन दाखवताना त्यांनी बीडच्या शिवाजी चौक ते बार्शी नाका सुमारे पाच कोटी रुपय, आष्टी ते अहमदनगर ५० किमीसाठी ६४० कोटी रुपय, पोहणेर सीरसाळा २५ कोटी, धारूर आडस १७ किमी, परळी सिरसाळा पांगरी नदीवर मोठा पूल आणि वॉटर स्टोरेज, तर माजलगाव केज धारूर रस्ता खराब झाला. तो गुत्तेदारांमार्फत दुरुस्ती करून घेण्याची हमी दिली. सी आर एम योजने अंतर्गत करोडो रुपय दिल्याचे त्यांनी सांगितले. बीड जिल्हा विकासाची मी केवळ गॅरंटी नाही तर पालकत्व घेतो. तुम्ही पंकजाताईला मतदान करून दिल्लीला पाठवा. आपला जिल्हा देशात विकासाच्या बाबतीत नंबर एकचा बनवल्या शिवाय राहणार नाही हे सांगताना पंकजा माझी मुलगी असल्याचा आवर्जून उल्लेख

त्यांनी केला. राजकारणात जाती पातीचे प्रयोग समाजासाठी घातक ठरू शकतात. नेतृत्वाच्या अंगी असलेले गुण आणि कर्तुत्व हा विचार मतदारांनी करायला हवा. गोपीनाथराव मुंडेची आठवण काढत त्यांनी माझ्या राजकीय जीवनात त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. रात्री बारा वाजता कोणाचा फोन आला तर, उचलून सामान्य लोकांची कामे करणारा नेता म्हणजे मुंडे साहेब. माणसं जातीच्या आधारावर नाही तर, कर्तुत्वाच्या आधारवार मोठी होत असतात. पंकजाताईचे कर्तुत्व आणि नेतृत्व क्षमतेचे असून त्यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यासह मारठवाड्याचा आणि राज्याचा विकास झाल्या शिवाय राहणार नाही हा विश्वास त्यांनी दिला.

### १० हजार कोटी रस्ते विकासाला दिल्या बद्दल, पंकजाताईने गडकरींची मानले आभार ..!

या जाहीर सभेत भाषणाच्या सुरवातीलाच आदरणी गडकरी असा उल्लेख करत नितीन गडकारींनी माझ्या वडिलांच्या सोबत राजकीय जीवनात काम केले. माझ्यासाठी ते नेता नसून काका असल्याचा उल्लेख त्यांनी केला. विकासाचे महापुरुष अशी ओळख त्यांची असून आपल्या बीड जिल्ह्यात रस्ते विकासासाठी केंद्रात सरकार आल्यानंतर माझ्या एका पत्रावर सुमारे दहा हजार कोटी काम मंजूर केल्याबद्दल त्यांनी जाहीर सभेत त्यांचे आभार मानले. बीड जिल्ह्यात आम्हाला तरुणांना रोजगार मिळावा म्हणून एक मोठा उद्योग आणि गरिबांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सर हॉस्पिटल उभा करायचे असून आमचे पालकत्व स्वीकारावे असे सांगत राजकारणात काम करताना मी केवळ विकासाचे राजकारण केल्याचा उल्लेख त्यांनी केला. या सभेला भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. प्रकाश दादा सोळूंके, आ. लक्ष्मण पवार, मोहन जगताप, रमेशराव आडसकर, देविदास राठोड, बाबुराव पोटभरे, नितीन नाईकनवरे, डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, अरुण आबा राऊत, आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन शहर अध्यक्ष दळवी यांनी मांडले. अक्षय तृतीयाचा दिवस असताना देखील मोंढा मैदानावर पार पडलेल्या सभेला मोठ्या संखेने लोक उपस्थित होते.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT